ठेकेदाराचे नांव :- मे. हिंदुत्व महिला स्वयंमसहायता बचत गट
गल्ली नं. १६, आंबेडकर नगर, उत्तन रोड,
सुभाषचंद्र बोस मैदान समोर, भाईंदर (पश्चिम)
ठाणे-४०११०१.

कामाचे नांव :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील ५००
चौ.मी. क्षेत्रफळ असलेले ५ उद्याने यांची निगा
व देखभाल महिला बचतगट यांच्याद्वारे
प्रायोगिक तत्वावर ०२ वर्षाकरीता करणे.
(Tender ID : २०२४_MBMC_९८५६८७_१)

भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये Rs. 500

सत्यमेव जयते

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2023 ◐ CE 820483

जिल्हा कोषागार कार्यालय, ठाणे

23 JAN 2024

प्रमुख लिपीक / लिपीक

कोषागार ठाणे

# // करारनामा //

हा करारनामा दिनांक १३/०३/२०२४ रोजी करण्यात येत आहे. हा करारनामा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये प्रस्थापित मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वतीने उप. आयुक्त (उद्यान) श्रीम. कल्पिता पिपळे पत्ता – मुख्य कार्यालय, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), जि. ठाणे यांचे मार्फत त्यांच्या पुढील म्हणजेच या प्रकरणी प्रथम पक्षीय (संदर्भाखेरीज इतरत्र उल्लेख केल्याशिवाय) म्हणून उल्लेख केला जाईल आणि मे. हिंदुत्व महिला स्वयंमसहाय्यता बचत गट यांच्यावतीने त्यांचे प्रोप्रायटर श्रीम. त्रिशला प्रकाश ढोले पत्ता – गल्ली नं. १६, आंबेडकर नगर, उत्तन रोड, सुभाषचंद्र बोस मैदान समोर, भाईंदर (पश्चिम) ठाणे-४०११०१ यांना व्दितीय पक्षीय म्हणून संबोधण्यात येईल, यांच्यामध्ये करारनामा होत आहे.

160497

- 7 MAR 2024

# जोडपत्र - २

मुद्रांक विक्री नोंदवही अनुक्रमांक ..............................दिनांक...............

दस्ताचा प्रकार.....................................दस्त नोंदणी करणार आहे का होय/नाही

मिळकतीचे थोडक्यात वर्णन...................................................

मुद्रांक विकत घेणाऱ्याचे नाव-...........हिंदुत्व स्वयंसहाय्यता महिला बचत गट.........

हस्ते असल्यास त्यांचे नाव.......................................................

पत्ता-.................................सचिव.......खजिनदार.........

दुसऱ्या पक्षकाराचे नाव..............अध्यक्ष.......,.....मुद्रांक शुल्क रक्कम

7 MAR 2024

मुद्रांक विक्रेत्याची सही (श्री. वामन भोईर)...........................................

मुद्रांक विक्रीचे ठिकाण/पत्ता-श्री समर्थ कृपा, ८/२२,

भाईंदर शॉपिंग सेंटर, भाईंदर (प.) ४०१ १०१, मुद्रांक परवाना क्र. १२०१०४९

ज्या कारणासाठी ज्यांनी मुद्रांक खरेदी केला त्यांनी त्याच कारणासाठी मुद्रांक खरेदी केल्यापासून ६ महिन्यात वापरणे बंधनकारक आहे.

ज्याअर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये प्रस्थापित झालेली मिरा भाईंदर महानगरपालिका ही प्रथम पक्षीय असून मे. हिंदुत्व महिला स्वयंमसहाय्यता बचत गट हे व्दितीय पक्षीय आहेत.

ज्याअर्थी मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील ५०० चौ.मी. क्षेत्रफळ असलेले ५ उद्याने यांची निगा व देखभाल महिला बचतगट यांच्याद्वारे प्रायोगिक तत्वावर ०२ वर्षाकरीता करणे आवश्यक आहे.

सदर व्दिवार्षिक निविदेची प्रत Annexure No. "A" म्हणून संबोधण्यात येत आहे. सदर निविदेतील सर्व अटीशर्तीचे पालन करणेचे निविदाधारकाने मान्य केले आहे.

आणि ज्याअर्थी व्दितीय पक्षीय (L१) हे मे. हिंदुत्व महिला स्वयंमसहाय्यता बचत गट या नावाने व्यवसाय करीत आहेत आणि ज्याअर्थी व्दितीय पक्षी (L१) यांनी सदर कामाबाबत संमती दर्शविलेली आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील ५०० चौ.मी. क्षेत्रफळ असलेले ५ उद्याने यांची निगा व देखभाल महिला बचतगट यांच्याद्वारे प्रायोगिक तत्वावर ०२ वर्षाकरीता करणेकामी प्रशासकीय ठराव क्र. ३०७ दि.०८/०१/२०२४ रोजीच्या आर्थिक व प्रशासकीय मान्यतेने सदर कामाची जाहीर निविदा online E-tendering N.I.C.(National informatics Centre, Pune) च्या https://mahatenders.gov.in प्रणालीव्दारे व दै.सुरज प्रकाश व दै. महाराष्ट्र जनमुद्रा या वृत्तपत्रामध्ये प्रसिध्दी देवून दि.१८/०१/२०२४ ते दि.२५/०१/२०२४ या कालावधीत तसचे सदर निविदेस दि.०५/०२/२०२४ पर्यंत प्रथम मुदतवाढ व दि.१४/०२/२०२४ रोजी पर्यंत द्वितीय मुदतवाढ दिली असता ०४ निविदा प्राप्त झालेल्या असुन प्राप्त निविदाधारकांची Technical Bid दि.२०/०२/२०२४ रोजी उघडण्यात आली असता.

प्राप्त ०४ निविदाधारकांच्या कागदपत्रांची पडताळणी मा. निविदा समिती समोर करुन पात्र ०३ निविदाधारकांची Financial Bid उघडण्यास दि.२७/०२/२०२४ रोजी मा. निविदा समितीने शिफारस करुन दि.२८/०२/२०२४ रोजी मा.आयुक्त सो. यांच्या मान्यतेने पात्र ०३ निविदांची Financial Bid दि.०१/०३/२०२४ रोजी उघडली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झालेले आहेत.

| अ.क्र. | झाडाचा तपशिल | निविदाधारकाचे नाव | निविदेत भरलेले दर | वाटाघाटीअंतीचे मंजुर रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | To take care and maintainance of ५ Gardens, area under ५०० Sq.Mtr coming in Mira Bhaindar Municipal Corporation area by women saving group on experimental basis for ०२ years.<br>(Estimte Cost : Rs.१६,०८,२२०/-) | मे. हिंदुत्व महिला **स्वयंमसहाय्यता बचत गट** | +०.१०००% (Exess) Rs.१६०९८२८.२२ | As Per Estimate Rs.१६,०८,२२०/- |
| | | मे. सावित्री फुले महिला **स्वयंमसहाय्यता बचत गट** | +०.१०००% (Exess) Rs.१६०९८२८.२२ | As Per Estimate Rs.१६,०८,२२०/- |
| | | **मे. श्री सिध्दकला महिला स्वयंमसहाय्यता बचत गट** | +०.१०००% (Exess) Rs.१६०९८२८.२२ | As Per Estimate Rs.१६,०८,२२०/- |

वरील नमुद केलेल्या कामा करीता तीनही निविदाधारकांचे दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा उच्चत्तम असल्याने सदर दराची वाटाघाटीअंती अंदाजपत्रकीय दराने कामाचे वाटप करुन तीनही निविदाधारकांनी काम करण्याचे मान्य केले असुन वाटाघाटीअंती तीनही निविदाधारकांची (L१) यांची निविदा स्विकारणेकामी दि.०५/०३/२०२४ रोजी मा.निविदा समितीने शिफारस केलेली असुन सदरकामी तीनही निविदाधारक यांची निविदा स्विकारुन करारनामा करुन कार्यादेश देणेकामी मा.आयुक्त सो. यांनी दि.०९/०३/२०२४ रोजी मंजुरी दिलेली आहे.

तसेच सदरकामी मे. हिंदुत्व महिला स्वयंमसहाय्यता बचत गट यांनी ५ उद्यानांपैकी महापौर बंगला या उद्यानाचे निगा देखभालीचे काम करण्याची तयारी दर्शविलेली असुन याबाबत दि.०७/०३/२०२४ रोजी पत्रान्वये कळविलेले आहे. त्यानुसार महापौर बंगला उद्यानाच्या निगा देखभाली करीता व्दितीय पक्षीय मे. हिंदुत्व महिला स्वयंमसहाय्यता बचत गट यांना या कामासाठी नेमण्यासाठी ठरवीले आहे. सदरकामी अंदाजे रु.३,४१,३२६/- इतका खर्च अपेक्षित आहे.

सदर निविद दस्तावेज प्रत Annexure No. "A" म्हणुन संबोधण्यात येऊन करारनाम्याचा एक भाग आहे.

आणि ज्याअर्थी व्दितीय पक्षीय हे मे. हिंदुत्व महिला स्वयंमसहाय्यता बचत गट या नावने व्यवसाय करीत आहेत आणि ज्याअर्थी व्दितीय पक्षीय यांनी सदर कामाबाबत संमती दर्शविलेली आहे.

त्याच प्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये या करारनाम्याच्या व निविदेच्या अटीशर्ती उभय पक्षीयांना बंधनकारक आहेत.

या करारनाम्याच्या अटीशर्ती खालीलप्रमाणे आहेत.

१. सदरकामी निविदा पुस्तिकेतील व करारनाम्यातील सर्व अटी व शर्तीचे पालन करण्याचे व्दितीय पक्षीय यांनी मान्य केले आहे.

२. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विविध ठिकाणी व इतरत्र आवश्यकतेनुसार व वेळोवेळी केलेल्या मागणीनुसार क्षेत्रातील उद्याने यांची निगा व देखभाल इत्यादी कामे २ वर्ष कालावधी करीता करण्याचे काम व्दितीय पक्षीय यांनी मान्य केले आहे.

३. सदरकामी लागणारा आवश्यक तो तांत्रिक व क्षेत्रीय कर्मचारी वर्ग यांची व्यवस्था स्वत:च करावी लागेल. (निविदा पत्रकामध्ये नमुद केल्याप्रमाणे)

४. महानगरपालिकेमार्फत सदर कामाकरीता कोणत्याही प्रकारची मशीनरी, वाहन अथवा तांत्रिक कर्मचारी पुरविण्यात येणार नाही.

५. अंदाजपत्रकामध्ये नमुद केल्याप्रमाणे काम करणे बंधनकारक राहील.

६. निगा व देखभाल करणेकामी शोभिवंत झाडे, लालमाती व शेणखत महानगरपालिकेमार्फत पुरविण्यात येईल. सदर ठिकाणी शोभिवंत झाडे लावणे, लालमाती व शेणखत झाडांना टाकण्याची जबाबदारी द्वितीय पक्षीय यांची राहील.

७. सदर ठिकाणी महापालिकेचे नळ कनेक्शन नसल्यास पाणी पुरवठा करुन देण्याची जबाबदारी प्रथम पक्षीय यांची राहील.

८. व्दितीय पक्षीय (L१) यांनी ५% सुरक्षा अनामत रक्कम देण्याचे मान्य केलेले असून चालु देयकामधुन ५% सुरक्षा अनामत रक्कम कपात करण्यात येईल. सदरची सुरक्षा अनामत रक्कम मनपा फंडात जमा करण्याचे व्दितीय पक्षीय (L१) यांनी मान्य केले आहे.

९. व्दितीय पक्षीय यांनी सदरचे निगा व देखभालीचे कामे पुर्ण केल्यानंतर प्रत्येक महिन्या करीता काम केल्यानंतर ०५ तारखेच्या आतमध्ये योग्य ते लेखी देयक महानगरपालिकेस सादर करतील व तदनंतरच कामाची खात्री झाल्यानंतर सदर देयकाची रक्कम १५ दिवसाच्या आतमध्ये महानगरपालिका व्दितीय पक्षीय यांना देवु करेल असे उभयपक्षीय यांनी मान्य केले आहे. काही कारणास्तव देयकाची रक्कम वितरण करण्यास विलंब झाल्यास त्यावर कोणतेही व्याज भरणेस प्रथम पक्षीय जबाबदार राहणार नाही.

१०. द्वितीय पक्षीय यांनी देयकासोबत संबंधीत अधिकारी यांचा काम समाधानकारक व पुर्ण केल्याबाबतचा दाखला जोडणे आवश्यक आहे.

११. व्दितीय पक्षाने/निविदाधारकाने सदरचे काम २ वर्ष कालावधीच्या आत काम खंडीत केले अथवा निविदा नियम अटीशर्तींचा व करारनाम्यातील अटीशर्तींचा भंग केल्यास किंवा मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विविध ठिकाणी निगा व देखभाल करण्याबाबत संबंधीत खात्याकडून / विभागाकडून तक्रार प्राप्त झाल्यास / आल्यास व्दितीय पक्ष/ निविदाधारक यांची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल व सदरचे काम रद्द करण्यात येईल. सदरचा करारनामा रद्द करण्याची कार्यवाही करण्यापुर्वी प्रथम पक्षीय, द्वितीय पक्षीय यांस करारनाम्यातील अटीशर्ती पुर्ण करण्याबाबत ७ दिवसांची नोटीस देईल. सदरची नोटीस प्राप्त होऊन ही द्वितीय पक्षीय यांनी अटीशर्तीची पुर्तता करण्यास कसुर केल्यास सदर करारनामा रद्द करण्यात येईल व तदनंतर वरील नमुद काम इतर ठेकेदार यांच्याकडुन आवश्यकतेनुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील ५०० चौ.मी. क्षेत्रफळ असलेले ५ उद्यानं यांची निगा व देखभाल महिला बचतगट यांच्याद्वारे प्रायोगिक तत्वावर ०२ वर्षाकरीता कामे करुन घेण्यात येईल व त्याबाबतच्या फरकापोटी असणारी रक्कम व्दितीय पक्ष यांच्याकडुन अटीशर्तीनुसार / कायद्यानुसार / नियमानुसार वसुल करण्यात येईल.

१२. प्रथम पक्षीय यांनी विषयांकीत कामा संदर्भात वेळोवेळी दिलेले निर्देशांचे अंमलबजावणी करण्याचे जबाबदारी द्वितीय पक्षीय यांची राहील.

१३. द्वितीय पक्षीय यांनी निविदेत स्पष्ट केल्याप्रमाणे काम करणे बंधणकारक आहे. त्याप्रमाणे काम न केल्यास द्वितीय पक्षीय यांना प्रत्येक कामाकरीता दंड आकारण्यात येईल व सदर दंडाची रक्कम देयकातुन कपात करण्यात येईल.

१४. सदरकामी उभयपक्षीयांमध्ये काही वाद उपस्थित झाल्यास मा.न्यायालयाकडे दाद मागता येईल. मा.न्यायालयाचे क्षेत्र जिल्हा ठाणे असेल याची नोंद घेण्यात यावी.

१५. व्दितीय पक्षीय यांच्याकडून नियमाप्रमाणे आयकर व इतर सर्व प्रकारचे कर देयकातुन कपात करण्यात येतील. व्दितीय पक्षाने/ निविदाधारकाने प्रदान करावयाच्या करामध्ये वाढ झाल्यास वाढीव रक्कम प्रदान करण्याची जबाबदारी व्दितीय पक्षाची / निविदाधारकाची राहिल.

१६. या करारामुळे कुठल्याही स्वरुपाची मिरा भाईंदर महानगरपालिकेस क्षति झाल्यास व्दितीय पक्ष क्षतीपूर्ती हमी देत आहेत.

१७. महानगरपालिका कमी अधिक प्रमाणात आवश्यकतेनुसार व वेळोवेळी केलेल्या मागणीनुसार नव्याने विकसीत होणारी उद्याने, स्मशाने व दुभाजके यांची निगा व देखभाल करण्याची मागणी करील त्याप्रमाणे मंजुर दराने त्यांची निगा व देखभाल करणे, व्दितीय पक्षीय यांना बंधनकारक राहील.

१८. Safety requirements: सदर काम करताना कामगारांना इजा, अपघात अथवा मृत्यु संभवलयास (Accident, Loss of Life) याची सर्व भरपाईची व इतर कायदेशी जबाबदारी व्दितीय पक्षाची / निविदाधारकाची राहिल.

१९. Financial & Legal Liability: निविदेतील, करारनाम्यातील व कार्यादेशातील अटी व शर्तीमुळे तसेच सदोष कामामुळे वित्तीय व कायदेशीर प्रश्न निर्माण झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी व्दितीय पक्षाची / निविदाधारकाची राहिल.

२० Subcontract: व्दितीय पक्ष / निविदाधारकास सदर काम सबकॉन्ट्रॅक्टरास देता येणार नाही या व्यतीरिक्त द्वितीय पक्षाच्या घटणेच्या संरचनेत प्रथम पक्षीय यांच्या मान्यतेखेरीज कोणताही बदल करता येणार नाही. सदर बदल करावयाचे असल्यास द्वितीय पक्षीय यांनी प्रथम पक्षीय यांना कळविणे बंधनकारक राहील. असे असले तरी

घटनेच्या संरचनेत बदल झाली तरी द्वितीय पक्षीय यांची करारनाम्यात आखुन दिलेल्या जबाबदारीची अंमलबजावणी करणे द्वितीय पक्षीय यांच्यावर बंधनकारक राहील.

२१. सदर कामी व्दितीय पक्षीय यांनी भरलेले सुरक्षा अनामत रक्कम करारनाम्याचा २ वर्षाचा कालावधी झाल्यानंतर पुढील ६ महिन्याकरीता वैध राहील. सदर कालावधीनंतर द्वितीय पक्षीय यांनी लेखी अर्ज केल्यानंतर नियमाप्रमाणे महानगरपालिकेने परत करावयाचे मान्य केले आहे व त्या रक्कमेवर कोणतेही व्याज देण्यात येणार नाही.

२२. नैसर्गिक आपत्ती उदा. वारा, वादळ, पाऊस, पुर, विज पडणे, भूकंप, ज्वालामुखी, इ. व तसेच संप, संचारबंदी, इजा, अपघात यामुळे होणाऱ्या वित्तीय व मनुष्यहानीस व्दितीय पक्ष सर्वस्वी जबाबदार राहतील.

२३. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उद्याने इत्यादी ठिकाणच्या मोजमापाबद्दल काही तक्रारी आल्यास दोन्ही पक्षकारांच्या समोर (महानगरपालिका व ठेकेदार) पुनश्च: सदर ठिकाणचे मोजमाप घेण्यात येईल. केलेल्या मोजमापाप्रमाणे देयक कमी जास्त झाल्यास संबंधीत पक्षकाराकडुन वसूल करण्यात येईल.

२४. सदर करारनाम्याचा कालावधी दि.१४/०३/२०२४ पासून दि.१३/०३/२०२६ पर्यंत राहिल. परंतु काही कारणास्तव सदर करारनाम्याचा कालावधी वाढवावा लागल्यास, द्वितीय पक्षीय यांचे काम समाधानकारक असल्याची खात्री झाल्यानंतर करारनाम्याचा कालावधी वाढविण्याचा निर्णय घेण्याचा अधिकार प्रथम पक्षीय यांस राहील. सदर वाढीव कालावधीच्या करारनाम्याची मुद्रांक शुल्क भरण्याची जबाबदारी द्वितीय पक्षीय यांची राहील.

२५. सदर करारनाम्यासाठी मुद्रांक शुल्क कायद्यानुसार योग्य ती मुद्रांक शुल्क भरण्याची जबाबदारी द्वितीय पक्षीय यांची राहील.

२६. करारनाम्यातील वरील सर्व अटीशर्ती व निविदेतील सर्व अटीशर्ती प्रथम पक्षीय व व्दितीय पक्षीय यांनी मान्य केल्या असून त्या बंधनकारक आहेत व त्यानुसार स्वाक्षऱ्या करण्यात आल्या आहेत.

**प्रथम पक्षीय**

**(कल्पिता पिंपळे)**
**उप. आयुक्त (उद्यान)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**उपायुक्त (मु.)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**व्दितीय पक्षीय**
**(मे. हिंदुत्व महिला स्वयंमसहाय्यता बचत गट)**
**चे प्रोप्रायटर श्रीम. त्रिशला प्रकाश ढोले**

**हिंदुत्व स्वयंसहायता महिला बचत गट**

**अतिरिक्त आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**साक्षीदार**

१) नाव :- ललिता प्र. जामनिक · L.P. Jamnik
पत्ता :- खारीगाव B.P. ROAD भाईंदर ईस्ट

२) नाव :- रूपाली राजेश सावंत · RRSawant
पत्ता :- पारसदर्शन शॉप नं. ९
मोदी पटेल रोड भाईंदर (प.)

सन 2023 /2024 करारनामा नोंदवही
अनुं. क्र. ५६७ दि. १४ / ०३ /२४ अन्वये
नोंद करणेत आली

महापालिका सचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका